# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

# दिनांक 29/11/2020 (शनिवार)

---

## चोरी

१) पोलीस ठाणे नरखेड :— अंतर्गत सावरगाव रोड, नरखेड येथील फिर्यादी नामे किशना मारोतराव शेंडे हे २२/११/२०२० रोजी १५.०० वा. दरम्यान बाजारात गेले असता कोणीतरी अज्ञात चोरांनी त्यांची नगर परीषदेच्या स्वछता गृहासमोर उभी करून ठेवलेली हिरो कंपनीची मोटार सायकल क्र. एम. एच. ४०/ डी.ए. ६४९२ कि. २२,०००/— रू. चोरुन नेली. सदर प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे नरखेड येथे ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री मनोज गाढवे हे करीत असुन अज्ञात आरोपीचा शोध सुरु आहे.

२) पोलीस ठाणे रामटेक :— अंतर्गत कांद्री माईन्स, मनसर येथील फिर्यादी नामे अमित भाऊराव राऊत हे २१/११/२०२० रोजी १३.०० वा. दरम्यान हळदीच्या कार्यक्रमाला गेले असता कोणीतरी अज्ञात चोरांनी कार्यक्रमस्थळावरुन त्यांची हिरो पॅशन प्रो. क्र. एमएच—४० एएच ९४४८ किमंत २८,००० ही चोरुन नेली. सदर प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे नरखेड येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री रामेश्वर रावते हे करीत असुन अज्ञात आरोपीचा शोध सुरु आहे.

## रेती चोरी

१) पोलीस ठाणे पारशिवनी :— अंतर्गत मौजा आमडी फाटा येथे नाकाबंदी दरम्यान १) दिनेश खत्रु यादव ३९ रा. वार्ड क्र ०५ देवलापार २) महादेव उर्फे बबलु दयाराम पारधी वय ३५ रा. वार्ड क्र ०२ देवलापार हे त्यांचे ताब्यातील ट्रक क्र. एम पी २२/एच ०७२२ च्या डाल्यामध्ये क्षमतेपेक्षा व परवाना पेक्षा जास्त वाळुची चोरटी वाहतुक करून शासनाच्या महसुल बुडवितांना मिळुन आले. सदर प्रकरणी वर नमुद दोन्ही इसमांकडुन ०८ ब्रास रेती व ट्रकसह एकुण ८,३२,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करुन त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे पोरशिवनी येथे पोलीस नाईक संदिप कडु यांचे फिर्यादीवरुन कलम ३७९, १०९ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री उबाळे हे करीत आहेत.

# निष्काळजीपणे भरधाव वेगाने वाहन चालवुन मरणास कारणीभुत

१) पोलीस ठाणे एम. आ. डी.सी (बुटीबोरी) :— अंतर्गत एम. आ. डी.सी. चौक येथे टिप्पर क्र एम.एच ४०—बीजी.०००३ च्या चालकाने आपले टिप्पर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकल क्र. एमएच—३२ एक्स २८९६ ला मागुन धडक मारून अपघात केला. सदर अपघातात मोटार सायकल स्वार यशवंतनग,र मास्टर कॉलनी, हिंगनघाट निवासी १) गुलाब संतोष इटनकर वय ५० यांचा जागीच मृत्यु झाला आणि त्यांची पत्नी २) सौ. सुमीत्रा गुलाब इटनकर वय ५० यांचा उपचारादरम्यान मृत्यु झाला. सदर प्रकरणी श्री अतुल रामराव इटनकर वय ३१ वर्षे रा.यशवंतनगर, मास्टर कॉलनी, हिंगनघाट, जि.वर्धा यांचे तक्रारीवन टिप्पर क्र एम.एच ४०—बीजी.०००३ च्या चालकाविरुद्ध पोलीस ठाणे एम.आ.डी.सी. येथे कलम २८९, ३३७, ३०४(अ) भादंवी सहकलम १८४ मो.वा.का अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री दिनकर दराडे हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर.